


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# खानदेशातील आदिवासींची सांस्कृतिक परंपरा

प्रा. डॉ. राजविरेंद्रसिंग रुबजी गावित
विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धुळे.

## प्रस्तावना:

महाराष्ट्रातील खानदेश प्रदेशाला प्राचीन कालखंडापासून एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. प्राचीन वैभवशाली इतिहासाची साक्ष खानदेशात आढळणाऱ्या अनेक पुरातत्वीय साधनातून दिसून येते. भारताच्या कालखंडात सुलतान व मुघल राजवटीत खानदेश हा एक महत्त्वाचा सुभा होता. खानदेश आजही अहिराणी बोली भाषेचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. खानदेश हा वेगळी सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेला प्रादेशिक विभाग आहे. या प्रादेशिक विभागात जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्हे तसेच नाशिक जिल्ह्याचा पूर्व भागचा समावेश होतो. मध्ययुगीन काळात मध्य प्रदेशातला खंडवा जिल्ह्यातील असिरगड, बऱ्हाणपूर पर्यंत खानदेशचा विभाग ओळखला जात असे.आज खानदेश जळगाव, धुळे, नंदुरबार या तीन जिल्ह्यात तसेच नाशिक जिल्ह्यातील मनमाड, मालेगाव, सटाणा या तालुक्यांमध्ये विभागला गेलेला आहे. खानदेशातील नंदुरबार आणि धुळे जिल्हा आदिवासींच्या सांस्कृतिक वैभव संपन्नतेची साक्ष आजही देत आहे.

भारत हा विविध जाती धर्म, पंथ यांनी वैविध्यपूर्ण असा देश आहे. भारताच्या प्राचीन कालखंडापासून सामाजिक, सांस्कृतिक घटकात वैविध्यपूर्णता आढळते भारताला संपन्न असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळापासून आदिवासींचा संदर्भ विविध साधनांमध्ये आढळून येतो. वैविध्यपूर्ण सांस्कृतिक पार्श्वभूमी आदिवासींना लाभलेली आहे. पर्यावरणाचा विलक्षण परिणाम माणसाचा जडणघडणीवर होत असतो आदिवासींचे निसर्गाशी पारंपारिक नाते निर्माण झाले. परंतु इंग्रजांच्या वासाहती कालखंडात आदिवासींचे निसर्गाशी असलेले घनिष्ठ संबंध

दुरावू लागले कारण इंग्रजांनी आदिवासींच्या नैसर्गिक साधनांवर नियंत्रण प्रस्थापित केले. याचबरोबर आदिवासींचे आर्थिक शोषण देखील होऊ लागले.

आदिवासी निसर्गातील पृथ्वी, तेज, वायू, आकाश, चंद्र, वृक्ष, प्राणी, पूर्वज, अशा सर्वांमध्ये आपली संस्कृती पाहतो.आदिवासींचा धर्म हा मानवी जीवनाच्या अस्मितेचा दर्शन घडवणारा आहे. आदीम जमातीचे सण, उत्सव विवाहप्रसंगी गायली जाणारी त्यांची लोकगीते लोक नृत्य हे निसर्गाशी निगडित असतात. लोकनृत्य चित्रशैली व इतर मौखिक वाङ्मयाने आदिवासी समुदायाचे जीवन समृद्ध आणि चैतन्यदायी बनले आहे. आदिम जमातीची संस्कृती व निसर्गाशी घट्ट नाते दर्शवणारे पुढील भाषेतील लोकगीत अधोरेखित करते.

नाय भूलजी आमु धरती याहकील नाय भूलजी

इयु धरती पे पाने ने फुले, पाने ने फुले

मोनूमे पोडे तहा पाने भी तोड जी ने फुले भी तोडजी

नाही भुलजी आमु धरती याह्कील नाही भूल जी

इस धरती जीव बांदाउ जीव बांदाउ

इलीमिनीने जीवी लेजे आन दीही छाडजी

नाय भूलजी आमु धरती याहकील नाय भूलजी

(हे धरती माते तुझे अनंत उपकार आम्ही कधीही विसरू शकत नाही तूच पान आणि फुल देतेस आम्ही तुझ्या कुशीत वावरणारी लेकरे तूच आम्हाला अन्न आणि पाणी देतेस तुझीच आम्ही सारी लेकरं आहोत आम्ही सर्व एकत्र राहो तुझे उपकार आम्ही कधीही विसरणार नाही हा या गीताचा अर्थ होतो.)

आदिवासींना पराक्रमी इतिहासाची परंपरा लाभली आहे. आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी असल्याने भारत भूमीवर त्यांची मोठी साम्राज्य होती. भारत भूमीचा बहुसंख्य भूभागात आदिवासी राजांची सत्ता होती. मध्य भारतात वैभवशाली गोंड राज्य होती हा सर्व प्रदेश गोंडवना या नावाने ओळखला जात होता. उत्तर पश्चिम भारतात भिल्लांची राज्य होती माळव्याचे पठार ते थेट सातपुड्याच्या सात माळा आणि महादेव डोंगर ते अजिंठांच्या रांगा अशा विस्तीर्ण प्रदेशात राज्याच्या सीमा पसरलेल्या आहेत होत्या उत्तर आणि पूर्व मध्य प्रदेशात देखील नागा मिझो संथा अशा आदिवासींची स्वतंत्र राज्य होती सह्याद्री पर्वताच्या सानिध्यात महादेव कोळी आणि कोकणात जमातीची स्वतंत्र राज्य होती त्यांचा प्रदेश कोळवण या नावाने ओळखला जाईल. मध्य भारतातील प्रदेश भिलवाड या नावाने ओळखला जात होता.

आदिवासींना प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे रामायण काळात दंडकारण्य प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या याच लोकांना किरात, निषाद या नावाने ओळखले जात होते. जागतिक स्तरावर आदिवासी या शब्दप्रयोगा ऐवजी Aminist हा शब्दप्रयोग वापरला जातो. Aminist म्हणजे प्राणी पूजक खरंतर आदिवासी म्हणजे निसर्गपूजक आणि वंश परंपरागत देव देवतांची पूजा करणारे मूळ लोक. म्हणूनच आदिवासींना Aborigine अर्थात मूलनिवासी असे म्हटले जाते. अनेक परकीय व भारतीय विचारवंतांनी विविध नावाने आदिवासींचा उल्लेख केला आहे. एल्विन गीयर्सन, एस जी घुर्ये ,मार्टिन, रिस्प्ले ,ए.व्ही.ठाकूर यांनी Aborigine म्हणजे मूलनिवासी असे म्हटले आहे. आदीम अगर आदिवासी म्हणजेच Primitive Tribes असा उल्लेख हटन या तज्ञाने केला आहे. मानववंश शास्त्रज्ञांच्या संशोधनानुसार भारतातील आदिवासी प्रोटो ऑस्ट्रलाईड वंशाचे आहे. मोहंजदाडो येथील उत्खननातील सांगाड्यांच्या अवशेषात प्रोटो ऑस्ट्रलाईड वंशाचा अंश आढळलेला आहे. मुळात आदिवासी जमाती विषयी प्रचलित समाजामध्ये अनेक गैरसमज आहेत परंतु नंतरच्या काळात झालेल्या आदिवासींवर झालेल्या संशोधनामुळे आदिवासींबाबत

असलेल्या गैरसमज दूर होताना दिसत आहे आता प्रत्यक्ष निरीक्षण पद्धतीवर आधारलेल्या आधुनिक मानवशास्त्रीय अभ्यासामुळे आदिवासी समाजाची लक्षणे स्पष्ट करणे अधिक शक्य झालेले आहे. म्हणूनच डॉ मुजुमदार डी.एन यांनी आदिवासी जमातीचे सर्व लक्षणे समोर ठेवून एक व्याख्या स्पष्ट केलेली आहे. "समान नाव असणारा एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय." सन 1962 मध्ये भारतात आयोजित आदिवासी परिषदेने आदिवासींची ओळख पुढील शब्दात करून दिली आहे. "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणारा एक विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला समान सामाजिक व राजकीय रीतीरिवाजाप्रमाणे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एक जिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात."

उद्दिष्टे

- खानदेशाची सांस्कृतिक वैभवसंपन्नता अभ्यासणे.
- आदिवासी कोण आहेत? हे समजून घेणे
- आदिवासींचे धार्मिक जीवन अभ्यासणे.
- आदिवासींच्या सांस्कृतिक परंपरा अभ्यासणे.

आदिवासी हा मागासलेला, प्राथमिक अर्थव्यवस्थेत असलेला, नागरी संस्कृतीपासून दऱ्या खोऱ्यात राहणारा निरक्षर,अंधश्रद्धा बाळगणारा असे आदिवासी समाजाबद्दल समज सर्वसामान्य जनतेच्या मनात आहे. आदिवासी आणि आपला संबंध नाही अशीच भावना अगदी अलीकडच्या

काळापर्यंत नागरी समाजात दिसून येत होती. आदिवासींची समाज व्यवस्था भिन्न असली तरी अत्यंत साधी सरळ आहे. आदिवासींचे सामाजिक जीवन स्वतंत्र आणि निश्चित अशा भौगोलिक परिसरात असते. आदिवासींचे कौटुंबिक जीवन, नातीगोती, विवाह, देवदेवता, मनोरंजनाचे प्रकार, नृत्य, गाणी, शस्त्रे आणि अवजारे हे सर्व वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानव वंश शास्त्राच्या अभ्यासाला अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून महत्व मिळू लागले त्यावरून आदिवासी समाजाच्या प्रत्यक्ष जीवनाची निरीक्षण आणि अभ्यास होण्यास सुरुवात झाली. निसर्गपूजा, प्राणीपुजा, पितृपूजा या रूपात या प्राथमिक संस्कृतीमधील धर्म जीवन आणि उपासना दिसून येते. वनस्पती, पशु, प्राणी ,पूर्वज यांनी देवतांचे स्थान घेतलेले आढळते.

प्राचीन काळापासून वास्तव्यास असणाऱ्या आदिवासींचे सांस्कृतिक जीवन हे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिमधर्माचे विश्लेषण आदिवासींचे सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व इतर व्यवहार त्यांच्या सांस्कृतिक जीवनाशी अनुरूप असतात. आदिवासींच्या मनोरंजनाच्या कल्पनाही यातूनच साकारलेल्या असतात धर्म हे त्यांच्या समाज जीवनातील नियंत्रणाचे प्रभावी साधन आहेत. अलौकिक शक्ती असंतुष्ट होईल असे कोणतेही वर्तन आदिवासींना मान्य नाही साहजिकच सर्वांच्या आचार विचारात जीवन विषयक दृष्टिकोनात समानता दिसून येते याचे हेच कारण आहे की आदिवासींच्या धर्मश्रद्धा अलग करून आदिवासींचे जीवन समजणे कठीण आहे. रानावनात जंगलात राहणारे आदिवासींना सदैव निसर्गाचे सोबत असते. निसर्ग शक्तीच्या सामर्थ्याची त्यांना उत्तम जाण आहे. म्हणून कोणत्याही महत्त्वपूर्ण कामाची सुरुवात व सांगता बलाढ्य शक्तीपुढे लिन होऊन करीत असतात. आदिवासींच्या जीवनात प्रसंगा नुसार देवतांची पूजा केली जाते. या देवता वृक्ष, वनस्पती, प्राणी आणि मनुष्य यांच्या सामर्थ्य किंवा तेज असल्यास त्यांना देवता मानले जाते. ६ सर्व समाजात धर्मश्रद्धा आढळतात हे खरे पण आदिम समाजातील धर्म श्रद्धेचे वेगळेपण सहजपणे प्रत्यास येते. आदिम समाजात वैज्ञानिक दृष्टीचा अभाव असल्याने धर्माचे

तात्विक चिंतन ते करू शकत नाही. म्हणूनच निसर्गापुढे आदिवासी हा नतमस्तक होतो यातूनच पूर्वजांच्या पूजनाची प्रथा आदिवासींनी सुरू केली. आदिवासींची संस्कृती त्यांचे धार्मिक जीवन परंपरा यांचा अभ्यास केल्यास एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती समोर येते.

भारताच्या प्राचीन काळापासून मध्यगीन भारत होते आधुनिक भारताच्या कालखंडातील आदिवासींच्या ऐतिहासिक मूल्यांना नाकारण्यात आले आहेत सहाजिकच आदिवासी इतर समाजाला सुद्धा त्यांच्या ऐतिहासिक योगदानाची माहिती होत नाही. आदिवासींच्या पुढच्या पिढीला सुद्धा आपल्या वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक गोष्टींची जाणीव नाही परिणामी त्यांच्या सामाजिक, धार्मिक जीवनावर इतर घटक प्रभावशाली ठरतात. बहुसंख्य आदिवासी दऱ्याखोऱ्यात जंगलात राहतात अशा या आदिवासींचा मूळ धर्म हा पारंपारिक आणि निसर्गवादी आहे. आज सर्वजण आपण म्हणतो की आदिवासींकडे फार आदर्श संस्कृती आहे पण त्यांच्याकडे धर्माचे ओळखपत्र नाही पण आदिवासींना प्रदीर्घ प्राचीन संस्कृतीचा वारसा आहे. आदिवासी भारत भूमीचा मूलनिवासी व भारतीय गणराज्याचा प्रथम नागरिक आहे. आदिवासी समाजास सांस्कृतिक व सामाजिक वैभवाचा वारसा आहे. आदिवासी जमातीच्या संपन्नतेचे पुरावे आहेत पण आज ही वैभव संपन्नता गेली कुठे यांचे उत्तर आपल्याला सापडत नाही म्हणूनच महात्मा फुलेंच्या समग्र साहित्यात आढळतात.

गोंड, भिल्ल क्षेत्र होती मूळ धनी
इराणी मागुनी आले येथे
शूर भिल्ल कोळी शराने तोडली
हाकलून दिले रानोवनी

आदिवासी समाज हा निसर्ग पूजक असला तरी प्रतिकात्मक स्वरूपात दैनंदिन जीवनाशी निगडित वस्तू, वृक्ष यांची पूजा करतो. आदिवासींच्या भौगोलिक प्रदेशानुसार देवता बदलतात. स्थानिक जमातींच्या वैशिष्ट्यानुसार देवतांचे पूजन केले जाते.

<u>याहा मोगी</u>

सातपुड्यातील याहा मोगी देवी खानदेशातील आदिवासींचे मोठे श्रद्धास्थान आहे. याहा मोगी देवी आदिवासीचे कुलदैवत आहे. सातपुड्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून 'दाब' हे राज्याच्या केंद्रस्थानी होते. १९ याहा मोगी देवीला ज्या ठिकाणी स्थानापन्न करण्यात आले ते दाब गाव थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. आजही या ठिकाणी किमान तापमानांची नोंद होताना आढळते. आदिवासी राज्याचे चार खंड होते त्याला आदिवासी भाषेत चारी खोंड असे म्हटले जात होते. दाबच्या पूर्वेकडील नाहल पाटी म्हणतात तर पाश्चिमे कडील भागास दुबला पाटी, उत्तरेकडे नोथर पाटी आणि दक्षिणेकडे पेडाल पाटी अशी नावे दिली होती .२१ सातपुड्याचा हा प्रदेश विविध औषध उपयोगी वनस्पतींनी समृद्ध असा प्रदेश आहे. निसर्गाच्या सानिध्यात आदिवासी समुदाय राहत असल्याने त्यांना आयुर्वेदाचेही चांगले ज्ञान आहे. दाब नावाचे गवत या भागात जास्त असल्याने हा भाग 'हेलो दाब' म्हणून ओळखला जाते. दाब या ठिकाणी वैधी भिलट या आदिवासी आद्य पुरुषाचा सल्लाने राजे तारहमाल, बांभोऱ्या पोराबदेव, सिडगोवा इत्यादी राजे राज्यकारभार करीत होते. त्या सर्वांचा कोतवाल म्हणून डेब्रा दोड्या म्हणजे पोट मोठे असलेला आणि अधिक खाणारयास कोतवाल काम करीत होता. राज भांबोऱ्या याच्या राणीचे नाव देवगोंधार होते त्यांच्या मुलांची नाव गांदाठोकर आणि मुलीचे नाव मोगरा होते. पुढे याच परिसरात वास्तव्य करणाऱ्या राजा पांठा यांच्याशी यहा मोगी देवीचा विवाह होतो .जन कल्याणकारी कार्यामुळे राजा पांठा याहामोगी गांदाठोकर आदिवासींमधील वंदनीय विभूती ठरल्या याहा मोगीने स्वतःच्या वागणुकीने आदर्श घालून दिला. एका मानवाने

दुसऱ्या मानवाला समानतेची वागणूक द्यावी आपल्याजवळ असेल ते दुसऱ्यालाही द्यावे असे सामाजिक ऐक्याचे धडे याहा मोगी सर्वांना देऊ लागली याहा मोगी देवीच्या शिकवणुकीने आपला फायदा होतो. याहा मोगी आपल्या अडीअडचणींना धावून येऊन आपल्याला मार्ग दाखवेल या श्रद्धायुक्त भावनेने लोक तिला याहा म्हणू लागले.याहा म्हणजे मोठी माता म्हणून लागले. याहा मोगी देवीचे निवासस्थान महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशातील राज्यांच्या सीमेवर वसलेले आहेत. तिन्ही राज्यातील आदिवासी बांधव देवीच्या दर्शनाला येत असतात आदिवासी बांधवांबरोबर इतर समाजातील भक्तगण देखील याहा मोगी देवीच्या दर्शनात येत असतात. बांबू पासून तयार केलेल्या कणगीत याहा मोगी स्थानापन्न आहे. याहा मोगी देवी ज्या ठिकाणी स्थानापन्न झाली आहे त्या झोपडीचे छप्पर दाब नावाच्या गवतापासून तयार केली गेले आहेत. देवीचा यात्रोत्सवाला प्रारंभ महाशिवरात्रीपासून होतो लाखो लोक, भाविक देवीच्या दर्शनाला येतात. यात्रेला येताना भक्त देवीला अर्पण करण्यास भाताच्या लोंब्या, नारळ, महूची दारू आणि ज्याच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत असे भक्तगण देवीला नवस केल्याप्रमाणे कोंबडा आणि बकरा जिवंत सोडतात. देवीचे पूजेचे साहित्य नव्या कोऱ्या टोपलीत ठेवून ती टोपली पांढऱ्या वस्त्राने झाकली जाते यालाही हिजारी असे म्हणतात. ही हिजारी देवीच्या दर्शनाला निघाल्यावर कुठेही कोणत्याही कारणाने जमिनीवर ठेवायचे नसते ज्यांचा नवस पूर्ण झाला असे भक्तगण गाणी गात संपूर्ण गावकऱ्यांना निमंत्रित करून दर्शनाला जातात त्याला होब असे म्हणतात.

“ दुनिया ले सुख शांती देणारी याहा मोगी<br>
नाव तो अमर हाय माता देव मोगरा तो नाव<br>
आय दर्शनाले आलो हो<br>
आखो मे आरती नाऱ्याला दर्शन माने देंगे<br>
याहा मोगी नाव देव मोगरा याद आये मानतो तो सूर्य आले ”

या मौखिक पारंपरिक गीतातून व्यक्त होणारा श्रद्धा भाव असा आहे की सार्‍या जगाला सुख शांती प्रदान करणारी याहा तो माता देव मोगरा म्हणून श्रद्धेय आहे तुझे नाव या जगात अमर आहे तुझे नाव ऐकून मी दर्शनाला आलो आहे मला तुझ्या दर्शनाचा लाभ होऊ दे तुझा नवस फेडण्याकरिता मी नवी कोरी हिजारी टोपली घेऊन आलो आहे याकरिता डोंगर चढून आलो आहे मला सुख-समृद्धीचा आशीर्वाद दे.

<u>नीलीचारी देवता</u>

आदिवासींच्या परंपरा त्यांची संस्कृती पर्यावरणाशी समतोल असणारी आहे ज्येष्ठ महिना आणि मृगाची रिमझिम सुरू झाली की त्यांची पहिली निसर्गपूजन पार पाडते याला नीलीचारी असे म्हणतात. धरती मातेला विनम्र अभिवादन करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हा सामूहिक पूजा विधी पार पडतो .

<u>गोवाल पूजा</u>

आषाढ महिन्यात गोवाल देवतेची पूजा केली जाते गोवाल देव म्हणजे गोठ्यातील गाई गुरांची पूजा केली जाते. गोवाल पूजन करून गावातील वयोवृद्ध छोटीशी सभा घेऊन आषाढ महिन्यात होणार्‍या संसर्गजन्य आजारांपासून माणूस आणि पशुधन यांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे यासाठी जंगलातून काही औषधी वनस्पतीची मुळे घेण्यासाठी जाणकार व्यक्ती बरोबर प्रत्येक घरातील एक व्यक्ती जंगलात जातात.गोवाल पूजेसाठी नारळ आणि महूची दारू नैवेद्य म्हणून दाखवले जाते आणि कोंबडा देखील अर्पण केला जातो.

<u>चौरी आमास</u>

श्रावणी अमावस्येला कृषी संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या बैलांना या दिवशी पूर्णपणे आराम दिला जातो. मुळात आदिवासी हा प्राणी पूजक आहे दैनंदिन जीवनात बैल अत्यंत उपयुक्त ठरतात भारतातील कृषी व्यवसायातील बैल हा एक महत्त्वाचा घटक आहे. शेतीतील पहिले

पीक म्हणून मका हे पीक घेतले जाते. या मक्यातील काही कणसे गुरांना घालतात म्हणून पश्चिम खानदेशात या सणाचा उल्लेख चौरी आमास असा केला जातो चौरी आमास पंधरा दिवसापूर्वीच पौर्णिमा साजरी झालेली असते आदिवासींचे जीवन वनसंपत्तीवर अवलंबून असल्याने या सणाला विशेष महत्त्व आहे

<u>वाघदेव</u>

आदिवासी आपल्या दैनंदिन गरजा जंगलातून भागवतात साहजिकच जंगलातील प्राण्यापासून संरक्षण व्हावे आणि प्राणी देखील जंगल संपत्तीचा एक महत्त्वाचा घटक आहे असे म्हणून प्राण्यांचे पूजन आदिवासींमध्ये केले जाते. वाघ हा जंगलातील सामर्थ्याशाली प्राणी आहे. वनौषधी,लाकूड फाटा, कंदमुळे शोधार्थ नेहमीच आदिवासीना जंगलात जावे लागते अशा स्थितीत वाघ, सिंह अशाही इतर पशुंचा आदिवासींना नेहमीच सामना करावा लागतो. वाघापासून कुठलेही इजा आपल्याला होऊ नये म्हणून वाघाचे पूजन करण्यास सुरुवात झाली. वाघाचे पूजन प्रतिकात्मक स्वरूपात करण्यात येऊ लागले श्रावण मासात आदिवासी लोक वाढदिवसाच्या सोंग घेऊन वाढदिवस साजरा केला जातो कुणीतरी व्यक्ती ज्यांच्याकडे वंशपरंपरेने वागदेव बनण्याचा वारसा असतो अशी व्यक्ती वाघाचे सोग घेऊन गावाचे वेशीजवळ लपून बसते आणि गावातील पुरुष मंडळी या वाघाची पूजा करून वाघाला नैवेद्य दाखवतात त्यावेळेस गंगथा येथील जहागीरदाराने सांस्कृतिक केंद्र असलेल्या उधमगडी येथे वाघाची मोठी साडेतीन फुटाची लाकडी प्रतिमा तयार करून वाघदेव म्हणून स्थापन केले कार्तिक पौर्णिमेला या मूर्तीची भव्य पूजा केली जाते. परंतु तापी नदीवरील उकई धरणाच्या बॅकवॉटरमुळे ही लाकडी मूर्ती कालांतराने पूर्णपणे बुडाली त्यानंतर गावाच्या रितीरियोजाप्रमाणे वाघदेवाचे पूजन होऊ लागले नंतर गावातील कारभारी ,पुजारी, पोलीस पाटील हे प्रतिकात्मक स्वरुपात वाघदेवाचे पूजन करू लागले. जर

वाघदेवतेची पूजा केली नाही तर त्याची अवकृपा आपल्यावर होईल अशी आदिवासींची धारणा असते.

इंदल पूजा

इंदल हा नवसाचा सण आहे कोणत्याही कारणासाठी नवस केला जात असेल ते फलीत प्राप्त झाल्यानंतर हा समारंभ साजरा केला जातो इंदल वैयक्तिक किंवा सामूहिक पद्धतीने साजरा करीत असतात. हा समारंभ गावातील धार्मिक विधी पार पाडणारा पुजारी व कारभारी हे दोन व्यक्ती पार पाडतात सर्वप्रथम गावातील पोलीस पाटील किंवा कारभारी इंदल पूजेबाबत समस्त गावकऱ्यांना सूचना करतात त्याचप्रमाणे पूजेचा दिवस निश्चित झाल्यानंतर सर्व गावकरी कदंब वृक्षाखाली जमतात या इंदल पूजेसाठी कदमवृक्षाला महत्त्वाचे स्थान आहे. पुजारो पळसाच्या पानात मोहाची दारू ओतून साक पाडतो पारंपारिक पद्धतीने साक पाडून झाल्यावर तांदळाचे ठिपके तयार केले जातात कदम वृक्षाच्या फांद्यातून कुवारी मुलीच्या हातात देऊन त्या फांद्या गावात आणल्या जातात पुन्हा एकदा गावातील पुंजारो कारभारी फांद्यांचे पूजन करतात यानंतर कोंबड्या व बोकड इंदल देवास अर्पण केले जातात.

हिवारया देव

हिवारया देव म्हणजे गावाच्या सीमेचे रक्षण करणारा देव आदिवासी भिलोरी भाषेत हिवाऱ्या देव असे म्हटले जाते.गाव गावाच्या सीमेवर या देवतेची स्थापना केली जाते गावाच्या सीमेवर बैलाचे तोंड असलेले गोलाकार मूर्ती तयार करून गाव शिवेवर या देवतेची स्थापना होते. या देवतांना हिवारया देव असे म्हणतात गावातील पुजारी हिवाऱ्या देवीची पूजा करतो मोहाची दारूची साक पाडून खाकराच्या पानात गावकरी मंडळी दारू प्राशन करतात व बळी दिलेल्या बोकडाचे मटण तयार करून ते गावकऱ्यांमध्ये वाटले जाते.४२ साधारणपणे पहिला पाऊस झाल्यानंतर सर्वत्र हिरवळ निर्माण झाल्यानंतर पुंजारो व कारभारी हिवाऱ्या देवाची पूजन करतात

गावावर कोसळणाऱ्या नैसर्गिक आपत्ती पासून हिवाळा दिवस संरक्षण करतो अशी आदिवासींची समजूत आहे गाव शिवाराच्या आतील ग्राम जीवनाचे रक्षण आणि संगोपन ग्रामदेवता करतात अशी आदिवासींची श्रद्धा आहे.

पाळूडो

वसंत ऋतूतील झाडांना आलेल्या पालवीने प्रफुल्लित होऊन पारोळ्या देवाचे पूजन केले जाते आदिवासी बांधवांना अन्न उपलब्ध करून देत असल्याने आदिवासींच्या धार्मिक जीवनात पालुद्या देवाचे महत्त्वाचे स्थान आहे. पालुद्या देव निसर्ग देवता आहे अन्नधान्याची देवता म्हणून कणीकंसरी माताची पूजा केली जाते खळ्यात असल्या पिकांच्या कणसांची पूजा केली जाते यालाच कंसरी माता असे म्हणतात. कुटुंबातील डाया म्हणजे ज्येष्ठ व्यक्ती या कणसरी मातेचे पूजन करतो .

डोंगऱ्या देव

डोंगऱ्या देव कोकणी जमातीचे दैवत आहे गावाबाहेर असलेल्या डोंगराला ते आपले दैवत मानतात पश्चिम खानदेशातील साक्री , पिंपळनेर या भागात कोकणी आदिवासींची संख्या जास्त आहे.कोकणी पाड्यांवर राहणारे भिल्ल देखील डोंगऱ्या देवाची पूजा करतात गावातील मुख्य चौकात भगताद्वारे पूजा केली जाते. याप्रसंगी समस्त गावकरी जमा होतात. त्यानंतर मुख्य भगत किंवा पुंजारी डोंगरावर जातो डोंगर देवताची पूजा करतो जवळच असलेले कोंबड्याने बाण दिल्यास डोंगर देव पावला असे म्हटले जाते व सुख समृद्ध जीवनाची कामना त्या डोंगरा देवाकडे करतात.

<u>होलिका देवी</u>

भिल्ल जमातीमध्ये मध्यप्रदेशात यास भोंगऱ्या बाजार असे म्हणतात. खानदेशात प्रामुख्याने भिल्ल या जमातीचे बहुसंख्येने वास्तव्य आहे. भिल्ल आणि पावरा या दोन जमातीमध्ये होलिका उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा होतो. निसर्ग पूजक असलेला भिल्ल होलिका देवीला देवता मानतात ओली बाय ओली माता म्हणून आदरयुक्त शब्दाने तिच्या स्वागताची तयारी करतात. ४५ भारतात वास्तव्य असणाऱ्या जमातीत विविध पद्धतीने होळी सणस साजरा केला जातो . या हंगामात शेती व्यवसायाशी निगडित विविध कामे संपलेली असतात वर्षभर पुरेल एवढे धान्य बाजूला ठेवून उर्वरित धान्याची विक्री केली जाते. होळीच्या निमित्ताने सगळ्या घरातील लोकांना कुटुंब प्रमुख कपडे घेऊन देतो .होळी पेटवण्याचे दिवशी गावातील लोक एकत्र जमतात होळीच्या दंडाची पूजा होऊन रात्री गाव प्रमुखांच्या हस्ते होळी पेटवली जाते. नंदुरबार जिल्ह्यात मेवासी इस्टेट होत्या. यातील काठी संस्थानातील होलिका उत्सवाकरिता खानदेश नव्हे तर संपूर्ण भारतभर प्रसिद्ध आहे. काठी संस्थानातील होलिका उत्सव हा होळी प्रसंगी केल्या जाणाऱ्या दिंडन नृत्य करीता संपूर्ण भारतातच नव्हे तर परदेशात देखील लोकप्रिय आहे. असे म्हटले जाते की पळसाला पाने फुटली की भिल्लांची लग्न ठरवली जातात. होलीका उत्सव साजरा होण्यापूर्वी आदिवासी जमातीत विवाह ठरवले जात नाही. होळीचा सण हा पाच दिवस साजरा केला जातो होलिका उत्सवात मोठ्या प्रमाणात बोलीभाषेत गाणे गायली जातात.

ओली बाय ओली , गोवारी आली ,ओली बाय ओली

गोवारी आली काय काय लाली ,

गोवारी आली,ओली बाय ओली ,गोवारी आली

गाव दिवाळी

दिवाळी हा सण आदिवासी बांधवांमध्ये गाव दिवाळी म्हणून ओळखला जातो.या दिवसात विविध सोंग घेतलेले कलाकार आदिवासी सांस्कृतिक परंपरेवर आधारीत आपल्या कला सादर करतात त्यांना सोंगाड्या असे म्हटले जाते. गाव दिवाळी साजरी केल्यानंतर गावाची दिवाळी असते त्या गावातील सर्व आदिवासी लोक एकत्र जमतात गावातील पुंजारो या संदर्भातले सर्व धार्मिक विधी पार पाडतो. या गाव दिवाळी प्रसंगी वाघदेव, गोवालदेव या देवतांची पूजा केली जाते. या वेळेस कोंबडा किंवा बोकडाचा बळी दिला जातो.

आदिवासींच्या निसर्गदेवता

निसर्गात सर्व सजीव सृष्टी सामावलेली आहे. अशा स्थितीत आदिवासी हा निसर्गाच्या सानिध्यात राहून पर्यावरणाचे संतुलन राखण्याचा प्रयत्न करतो. कारण पर्यावरणातील घटकांचा संरक्षण आणि संवर्धनाची जाणीव आदिवासींना आहे आदिवासींच्या मूलभूत गरजा नैसर्गिक साधन संपत्तीतून भागवल्या जातात. निसर्गात घडणाऱ्या अनेक चमत्कारिक घटनांच्या अनुभव आदिवासी रोज घेत असतात व त्यामुळे त्यांच्या मनात निसर्गातील जीवसृष्टीबद्दल आदर आहे. त्यातूनच त्यांची स्वतःची वेगळी परंपरा व संस्कृती उदयास आली आणि वृक्ष वनस्पती डोंगर पशु पक्षी त्यांची दैवते बनली. निसर्गातील वनस्पती, वृक्ष आणि प्राणी यांनाही आदिवासी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. मोठ्याप्रमाणावर त्यांच्याकडून वृक्ष लागवड केली जाते. शनी वृक्षास भिलोरी भाषेत हेंगलो असे म्हणतात. त्या वृक्षाच्या पूजनास आदिवासी भाषेत हेगलो पुंजो असे म्हणतात.याच बरोबर पळस आणि काकड वृक्षांना महत्त्वाचे स्थान आहे. कोडाईबारी, तोरणमाळ, अक्कलकुवा, धडगाव येथे वनसंपदा विविधतेने समृद्ध आहे. पूर्वीपासून आदिवासी हा निसर्गाच्या सानिध्यात असल्याने त्याला जंगलातील वृक्ष प्राणी वनस्पती यांच्याशी चांगलीच ओळख निर्माण झाली आहे

विविध प्राणी पशु पशु पक्षी , प्राणी यांच्यापासून कसे संरक्षण करावे याची समज आदिवासींना आहे ते आपल्या दैनंदिन गरजा बहुतांशी जंगलातून प्राप्त करतात. जंगलातील औषधी वनस्पतींचे देखील आदिवासींना चांगले ज्ञान आहे. म्हणून एक प्रकारे आदिवासींचे मनात परोपकाराची भावना आहे. या भावनेतून वृक्ष पूजन आदिवासी समाजात केले जाते.

<u>पळस</u>

पळस या वृक्षाच्या पानांना आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणावर उपयोगात आणतात. कुठल्याही शुभकार्याच्या पूजनाप्रसंगी दारूचे प्राशन  केले जाते किंवा धार्मिक कार्य पार पाडत असताना साक  देताना ती पळसाच्या पानात दिली जाते. या पळसाच्या  पानापासून जेवणाच्या पत्रावळ्या  तयार करतात.आदिवासींचे पारंपारीक दैवताना  नैवेद्य दाखवताना पळसाच्या पानाचा उपयोग केला जातो. शेतातील धान्य साठवताना पळसाची पाने उपयोगात आणली  जातात. पळस पश्चिम खानदेशी मैदानी पठाणी बांधा सहजआढळतात याची उपलब्धता खूप मोठ्या प्रमाणावर आहे जंगलात किंवा शेताच्या बांधावर पळस उपलब्धअसल्याने त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो त्याला आदिवासी भाषेत ‘खाकरा’ पाने असे देखील म्हटले जाते.

<u>हेंगलो पूजो</u>

आदिवासींच्या विविध प्रसंगानुसार वृक्षांचे पूजन केले जाते शमी वृक्षाला भिंल भाषेत हेंगलो असे म्हटले जाते. लग्नविधीत प्रामुख्याने शमी वृक्षाचे पूजन केले जाते लग्न विधीवत पुंजारो या प्रसंगी  शमी वृक्षाचे पूजन करतो. लग्नात शमी वृक्षांचे पूजन केल्यानंतरच  नवरी  आपले माहेर सोडते  याला_हेंगलो पूजो_असे म्हणतात. नवरदेवाची हळद शमी वृक्षाचे पानांनी उतरवली जाते. म्हणून आदिवासींच्या पारंपारीक निसर्ग देवतेत महत्वाचे स्थान आहे.

महू.

महु वृक्षला आदिवासींच्या धार्मिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. महू एक प्रकारे आदिवासीचे कल्पवृक्ष वृक्ष आहे. कारण आर्थिकदृष्ट्या महुच्या बिया आणि फुले स्थानिक आदिवासी बाजारात जाऊन विकतात.महू फुलापासून मद्य तयार केले जाते आदिवासींच्या प्रत्येक शुभ आणि धार्मिक कार्यात महू पासून बनवलेल्या मद्याची साक पाडली जाते. खानदेशातील कोंडाइबारी,चरणमाळ जंगलात त्याचप्रमाणे धडगाव व अक्कलकुवा परिसरात मोठ्या प्रमाणावर महू वृक्ष शेतात आणि शेताच्या बांध्यावर महू वृक्ष मोठ्या प्रमाणावर आदळतात. महू वृक्षाखाली पारंपरिक देवतांची स्थापना केली जाते.

काकड

असे काकड वृक्षाचे शास्त्रीय नाव आहे लग्नविधी प्रामुख्याने काकड पक्षाची पूजा केली जाते आदिवासींच्या विवाहप्रसंगी लग्न करिता टाकला जाणारा मंडप विविध झाडांच्या फांद्या टाकून तयार करतात. लग्नाकरिता तयार करणाऱ्या मंडपात निलगिरी ,कडूनिंब यांच्याकडे जातात ज्या दिवशी या प्रकारचा पारंपारिक मंडप लावला जातो. त्या दिवशी त्या मंडपाला मांडव असे म्हणतात लग्नाच्या आदल्या दिवशी काकड वृक्षाची फांदी आणण्याकरिता नदी किनारी काकड वृक्ष असल्याने लग्न परिवारातील सदस्य आणि ग्रामस्थ बैलगाडीने नदी किनारी जातात व काकड वृक्षाची फांदी तोडून लग्नाचे मंडपात पूजा करतात लग्नाच्या एका मंडपात जवळ ही काकड वृक्षाची फांदी बांधतात आणि त्यानंतर त्या मांडवात नुत्य करण्यास करण्यास परवानगी असते.

निष्कर्ष

नंदुरबार जिल्ह्यात तलोदा येथील गुला महाराज नावाचे सुधारणावादी गृहस्थ होउन गेले. त्यानी जे काही सुधारणावादी विचार आदिवासीना दिले आणि आदिवासिमध्ये स्वाभिमान आणि

स्व संस्कृतीविषयी अभिमान जागृत होण्याकरीता 'आप चळवळ' निर्माण केली. आदिवासींमध्ये संत होऊन गेले विमाना इतर समाजाकडून मान पाहिजे तर त्यांनी एकमेकांना मान दिला पाहिजे निवेतून गुला महाराजांनी एकमेकांना अभिवादन करण्याची नवीन पद्धत शोधून काढली आदिवासी बांधव एकमेकाना भेटल्यावर अभिवादन म्हणून 'आपकी जय'असे म्हणण्यास सुरुवात केली. आत्मसन्मानाची जाणीव आदिवासी समाजाला करुन दिली.

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या सामाजिक जीवनात सातत्याने बदल होऊ लागला भारत सरकारच्या विविध योजना, आरोग्य, शैक्षणिक सुविधा आणि स्वातंत्र्योत्तर भारतात बहुतांश आदिवासी खेडापाडयातील असलेली पीढ़ी आश्रमशाळेत शिकली अशी शिक्षित पिढी पुढच्या शिक्षणासाठी नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने आपल्या स्थानिक परिसर सोडून बाहेर पडू लागली. प्रचलित प्रस्थापित समाजाच्या सामाजिक धार्मिक चालीरीती जवळून बघण्याची संधी निर्माण झाली. आपले जीवनमानात सुधारणा करण्यासाठी शिक्षणाचा मोठा उपयोग झाला.

प्रस्थापित समाजाच्या दुष्टिकोनातून आदिवासी जंगलात राहणारे, मागासलेले या स्वरूपाचा होते. काही विशिष्ट समुदाय, राजकीय पक्ष, संरक्षण, विकास आणि इतर प्रलोभानद्वारे हिंदू संस्कृती त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न करीत आहे. जातीयवादी घटक आदिवासींच्या सांस्कृतिक आणि धार्मिक प्रतीकांवर हिंदू म्हणून आपला देवतांचा प्रभाव त्यांच्या प्रतिकावर करताना दिसत आहे. विविध धार्मिक संघटना व NGO संस्था आदिवासी वास्तव्य करून राहिलेल्या प्रदेशात कार्यरत आहे.सा सर्वाचा उद्देश विकासात्मक असला यातील काही संस्था,संघटना आदिवासी जनतेची दिशाभूल करतात.आज आदिवासी देव धर्माच्या नावाखाली सर्वात जास्त पिचलेला आहे.

संदर्भसूची:

१.गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 2004, पुणे

२.नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 2012, पुणे

३.सावळीकर संजय, भारतीय आदिवासींचे जीवन आणि संस्कृती, 2014 श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

४.गारे गोविंद, महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि आदिवासी जमाती, 2002, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

५.लोहकरे संजय, आदिवासींच्या धार्मिक अस्मितेचा उदय, 2011, यशोदीप क्रिएशन, पुणे

६.कुलकर्णी अ .रा, कंपनी सरकार, 2012, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे

७. स्मरणिका, आदिवासी विभागीय साहित्य संमेलन, 2015,नाशिक

८.गावित पुष्पा, आदिवासी भाषा आणि संस्कृती, 2014, अथर्व प्रकाशन, जळगाव

९.शहा मू.ब, खानदेशचा सांस्कृतिक इतिहास  भाषा व लोक दैवते, 2004, का.स.वाणी,  मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे

१०.ठकार शंकर विनायक, आप श्री गुला महाराज, 2001, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.

७.SimCox A.H.A  Memoier of the khandesh Bhil Corps, 1912, Thakur & Company Bombay